**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# सन: 2024 च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांचे विश्लेषणात्मक अध्ययन

**शरद अर्जुन वाघ[1], डॉ. संदीप भाऊराव नेरकर[2]**
[1]संशोधक, सहाय्यक प्राध्यापक, कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, मनमाड
[2]मार्गदर्शक , प्राध्यापक, प्रताप कॉलेज अमळनेर
**Email:** sharadwagh141@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171219
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 95-97
December 2025

**Submitted:** 17 Nov. 2025
**Revised:** 27 Nov. 2025
**Accepted:** 12 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***गोषवारा***

*महाराष्ट्र विधानसभा 2024 च्या सार्वत्रिक निवडणुका निवडणुकीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक निवडणुका होत्या. या निवडणुकीत महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठे बहुमत भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षाला मिळाले. तर विरोधी पक्षांना विरोधी पक्ष नेता बनवता येईल इतके ही संख्याबळ मिळाले नाही. 1995 नंतर सर्वाधिक मतदान या निवडणुकीमध्ये झाले. लोकसभा निवडणुकीनंतर धक्का बसलेल्या भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांसाठी या निवडणुका अमृतवाहिनी ठरल्या. लोकसभेत मिळालेल्या यशानंतर विरोधी पक्षांसाठी या निवडणुका एक दुःखद स्वप्नासारख्या ठरलेल्या दिसून येतात. प्रत्यक्ष आर्थिक मदतीच्या सरकारी योजना मतदार वर्तनावर गंभीर परिणाम करतात हे या निवडणुकीत प्रकर्षाने दिसून आले. महायुती सरकारची लाडकी बहीण योजना या निवडणुकीत गेम चेंजर ठरली.*

***महत्त्वाचे शब्द :*** *महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024, महायुती, महाआघाडी, मतदार वर्तन, निवडणूक प्रचार माध्यमे, राजकीय आघाडी.*

## प्रस्तावना

लोकशाही देशांमध्ये निवडणुका हा एक मोठा राजकीय उत्सव असतो. लोकांना आपल्या पसंतीचे सरकार निवडण्याची एक महत्त्वाची संधी असते. म्हणूनच निवडणूक काळामध्ये लोकांमध्ये एक मोठा उत्साह दिसून येतो. महाराष्ट्र हे भारतातील एक महत्त्वाचे आर्थिक संपन्न व राजकीय दृष्ट्या संवेदनशील राज्य आहे. या राज्यातील निवडणुका पूर्ण देशावर प्रभाव टाकण्यास सक्षम आहेत. महाराष्ट्रातील 2024 च्या लोकसभा निवडणुका सत्ताधारी भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना धक्का देणाऱ्या ठरल्या तर विधानसभा 2024 च्या निवडणुका विरोधी पक्षांना धक्का देणाऱ्या ठरल्या. या निवडणुकांमध्ये काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांना दारून पराभवाला सामोरे जावे लागले तर भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना प्रचंड बहुमत मिळाले. मतदारांना प्रत्यक्ष आर्थिक मदत देणाऱ्या शासकीय योजना मतदाराच्या निर्णय प्रक्रियेवर मोठा परिणाम करू शकतात हे यातून दिसून आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना 2024 च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत भाजप व त्यांच्या मित्र पक्षांसाठी वरदान ठरल्याचे दिसून येते.

## संशोधन पद्धती (Research Methodology)

सदर शोध निबंध संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम संशोधन साधनाचा वापर केला गेला आहे. निवडणूक आयोगाचे अधिकृत निकाल, वृत्तपत्रातील विधानसभा निकालाची रिपोर्ट, डिजिटल माध्यम, पक्षीय घोषणापत्रे इत्यादींचा वापर केला गेला. तसेच प्राथमिक संशोधन साहित्याचाही वापर केला गेला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*शरद अर्जुन वाघ, संशोधक, सहाय्यक प्राध्यापक, कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, मनमाड*

**How to cite this article:**
*वाघ, . शरद . अर्जुन ., & नेरकर, . संदीप . भाऊराव . (2025). सन: 2024 च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांचे विश्लेषणात्मक अध्ययन. Journal of Research and Development, 17(12(A)), 95–97.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18184443*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18184443
OPEN ACCESS

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

उमेदवारांशी चर्चा, स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांशी सल्लामसलत तसेच संशोधकाचा अनुभव याचे आधारे संशोधकाने प्राथमिक माहिती गोळा करून सदर संशोधन कार्य पूर्ण केले आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय पद्धतीचा वापर केला गेला आहे. सांख्यिकीय तक्त्यांच्या आधारे विश्लेषण केले गेले आहे.

**संशोधन उद्दिष्टे (Research objective)**

1. 2024 च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीतील पक्षनिहाय कामगिरीचा अभ्यास करणे.
2. मतदारांच्या मतदान वर्तनाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.
3. शासकीय योजनांचा मतदारांच्या मतदान निर्णय प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
4. निवडणूक प्रचारात डिजिटल माध्यमांचा प्रभाव अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके (Hypotheses):-**

1. रोख रक्कम देणाऱ्या शासकीय योजना मतदाराच्या निर्णयावर परिणाम करतात.
2. डिजिटल प्रचार माध्यमांचा प्रभाव युवा मतदारावर परिणामकारक ठरतो.
3. मतदार राज्यस्तरीय मुद्यापेक्षा स्थानिक मुद्द्यांना जास्त प्राधान्य देतात.

**संशोधनाचे विश्लेषण**

महाराष्ट्र विधानसभा 2024 च्या सार्वत्रिक निवडणुका अनेक अर्थाने ऐतिहासिक ठरल्या आहेत. भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांनी 235 जागा जिंकत ऐतिहासिक विजयाची नोंद केली. तर काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांना महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच विरोधी पक्ष नेता बनवण्याइतपतही संख्याबळ मिळाले नाही. 1995 नंतर प्रथमच 2024 च्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण 66.57% इतके प्रचंड नोंदवले गेले होते. वाढलेले मतदान मतदारांमध्ये मतदान प्रक्रियेत समाविष्ट होण्यासाठी तीव्र उत्सुकता होती हे दर्शविते. लोकसभेत भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना अनपेक्षित धक्का बसला होता. तो लक्षात घेऊन त्यांनी मागील चुका विधानसभेच्या निवडणुकीत दुरुस्त केलेल्या दिसून येतात.

लोकमत आपल्या बाजूने खेचण्यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना यांसारख्या प्रत्यक्ष रोख रक्कम देणाऱ्या योजना राबवून संख्येने 50% असलेल्या महिला वर्गांना खुश करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.2024 च्या निवडणुका पूर्वी महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी तत्कालीन महायुती सरकारने राज्य परिवहन मंडळाच्या बस भाड्यामध्ये महिलांना 50% सूट दिली. यांसारख्या अनेक योजना महिला मतदारांना केंद्रस्थानी ठेवून आकर्षित करण्यासाठी तात्काळ प्रभावाने अमलात आणल्या गेल्या. त्याचा प्रचंड फायदा महायुती सरकारला निवडणुकांमध्ये झालेला दिसून आला आहे. महिला मतदारांना आकर्षित करण्याचा हा सरकारचा प्लॅन गेम चेंजर ठरला. लोकसभेत मतदारांनी नाकारलेल्या महायुती सरकारला विधानसभेत प्रचंड जनमताच पाठिंबा मिळालेला दिसून येतो.

**2024 च्या निवडणुकीचे विश्लेषण:**

2024 च्या निवडणुकीमध्ये 266 पुरुष उमेदवार जिंकले आहेत तर 22 स्त्री उमेदवार जिंकले आहेत. मागील काही निवडणुकीच्या तुलनेत यावेळी स्त्री उमेदवारांच्या निवडून येण्याचे प्रमाण घटलेले दिसून येते. मतदानाचा हक्क बजवणाऱ्या मध्ये 66.69% पुरुष तर 65.21% स्त्री मतदानाचा टक्का राहील आहे. या निवडणुकीत महिलांच्या मतदानात वाड झाल्याचे दिसून येते. निवडणूक प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांचा वापर करण्यात आला. तरुण मतदारामध्ये मोठ्या प्रमाणात समाज माध्यमावरील जाहिराती तसेच कलात्मक दृष्टीकोणातून तयार केलेले कंटेण याचा वापर राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय प्रचारात करून घेतला.

**2024 च्या निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्षांना मिळालेली मते व जागा**

| अ. क्र. | राजकीय पक्षाचे नाव | लडवलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | मिळालेली मते | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भारतीय जनता पार्टी | 149 | 132 | 1,72,93,650 | 26.97% |
| 2 | शिवसेना (शिंदे गट) | 81 | 57 | 79,96,930 | 12.47% |
| 3 | राष्टवदी काँग्रेस (अजित पवार गट) | 59 | 41 | 58,16,566 | 9.07% |
| 4 | राष्टवदी काँग्रेस (शरद पवार गट) | 86 | 10 | 72,87,797 | 11.36% |
| 5 | राष्ट्रीय काँग्रेस पक्ष | 101 | 16 | 80,20,921 | 12.51% |
| 6 | शिवसेना (ठाकरे गट) | 95 | 20 | 64,33,013 | 10.03% |

# वरील माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून घेण्यात आली आहे

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक 149 जागेवर आपले उमेदवार उभे केले होते त्यापैकी 132 जागा त्यांनी जिंकले आहेत. एकूण मतदानापैकी 26.97% मते हे भारतीय जनता पक्षाला मिळालेली दिसून येतात. म्हणजेच या निवडणुकांमध्ये सर्वात जास्त जागा व मतांचा टक्का आपल्याकडे ठेवणारा भारतीय जनता पक्ष हाच सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. भारतीय जनता पक्षाच्या तुलनेत इतर पक्षांना मिळालेली मते व जागा ह्या निम्म्यापेक्षाही कमी दिसून येतात. यानंतरच्या सर्वात जास्त जागा 57 इतक्या जिंकलेल्या आहेत त्या शिवसेना शिंदे गटाने. त्यांनी एकूण मता पैकी 12.47% मतांची टक्केवारी स्वतःकडे राखली आहे.

मतांच्या टक्केवारीचा विचार केल्यास राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला शिंदे गटापेक्षा जास्त 12.51% मतांची टक्केवारी स्वतःकडे ठेवण्यात यश मिळाले आहे. परंतु निवडून आलेल्या जागांच्या संदर्भात विचार केल्यास काँग्रेस पक्षाच्या केवळ 16 जागा निवडून येऊ शकल्या आहेत. म्हणजेच काँग्रेस पक्षाचा प्रभाव हा अनेक मतदारसंघांमध्ये विस्तृत स्वरूपात मिळालेला आहे त्यामुळे जास्त टक्के मते मिळूनही त्यांचे उमेदवार तुलनात्मक दृष्ट्या कमी निवडून आलेले दिसून येतात. या निवडणुकांमध्ये सर्वात जास्त 'स्ट्राईक रेट' हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा राहिला आहे. 'स्ट्राइक रेट' म्हणजेच निवडणुकीला लढवलेल्या जागा व निवडून आलेल्या जागा यांच्यातील सरासरी होय. अजित पवार गटाने एकूण मताच्या टक्केवारी केवळ 9.07% मते मिळूनही त्यांचे 41 उमेदवार निवडणूक मध्ये विजयी झालेले दिसून येतात. या गटाचे केवळ 59 उमेदवार निवडणुकीसाठी रिंगणात होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने 86 जागा लढवलेल्या होत्या त्यापैकी 10 जागा त्यांनी जिंकल्या आहेत. त्यांच्या मतदानाचा शेअर हा 11.36% राहिला आहे.

महाविकास आघाडीतील महत्त्वाचा घटक पक्ष म्हणजे शिवसेना ठाकरे गट या गटाने 95 जागा विधानसभा निवडणुकीत लढवलेल्या होत्या त्यापैकी 95 जागा विधानसभा निवडणुकीत लढवलेल्या होत्या त्यापैकी 20 जागा या पक्षाच्या निवडून आलेल्या आहेत एकूण मतदानाच्या टक्केवारीत 10.03% मते या पक्षाला मिळाली आहेत. एकूण मतदानाचा विचार करता भारतीय जनता पक्ष व त्यांच्या मित्र पक्षांनी एकूण मताच्या टक्केवारी मध्ये 48.51% मते स्वतःकडे ठेवण्यात यश मिळवले असून एकूण 288 जागेपैकी 230 जागा जिंकल्या आहेत. सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या धक्क्यामधून सावरून या पक्षांनी आपला मोठा विजय विधानसभा निवडणुकीत साकार केला आहे.

राष्ट्रीय काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीमध्ये लोकसभा निवडणुकीनंतर चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले होते परंतु विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी परत या आघाडीवर पराभव स्वीकारण्याची वेळ आली आहे. सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे प्रदर्शन एकूण 288 मतदार संघांपैकी केवळ 46 मतदारसंघांमध्येच त्यांना विजय मिळवता आला आहे. एकूण मतदानापैकी 33.9% मतदान मिळवण्यास ते यशस्वी ठरले आहेत. हे प्रदर्शन आज पर्यंतच्या सर्वच विरोधी पक्षांमध्ये सर्वात चिंताजनक राहिले आहे. विरोधी पक्षनेतापद मिळवण्यासाठीही ही संख्या पुरेसी नाही. 2024 ची सार्वत्रिक विधानसभा निवडणूक राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व त्यांच्या घटक पक्षांना एका दुःखद स्वप्नासारखी ठरली आहे.

**निष्कर्ष**

1. 2024 च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांनी डिजिटल प्रचार माध्यमांचा प्रभावी वापर केलेला दिसून येतो. प्रत्येक राजकीय पक्षाकडे स्वतःचा सोशल मीडिया व आयटी सेल विभाग कार्यरत असलेला दिसतो. या विभागांनी निवडणूक कामांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सोशल मीडिया वापरकर्त्यांवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केलेला आहे.
2. मतदारांना प्रत्यक्ष आर्थिक लाभ पोहोचवणाऱ्या शासकीय योजना निवडणुकीमध्ये गेम चेंजर ठरलेल्या दिसून येतात. महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या बस मध्ये 50 टक्के भाडे सवलत योजना व 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' या योजना भाजप व त्यांच्या मित्र पक्षासाठी गेम चेंज ठरल्या आहेत.
3. महिला मतदारांना आपल्याकडे आकर्षित करणाऱ्या विविध योजना तात्कालीन सरकारने लागू केल्यामुळेच त्यांना महिलांचा मोठा पाठिंबा सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत मिळालेला दिसून येतो.
4. विरोधी पक्ष लोकसभेला मिळालेल्या यशा मधून विधानसभेलाही असेच यश मिळेल असा भ्रमात राहिल्यामुळे व सत्ताधारी पक्ष मागील अपयशातून मतदारांचा कौल लक्षात घेऊन विविध योजना असल्यामुळे विधानसभेला यशस्वी झालेला दिसून येतो.

**संदर्भ**

1. Kothari Rajni. *Politics in India.* New Delhi: Orient Black swan.
2. Yadav, Yogendra. *Understanding Indian Politics.* New Delhi: Oxford University Press.
3. Palshikar Suhas & Deshpande Rajeshwari. *Electoral Politics in Maharashtra.* New Delhi: Routledge India.
4. *Maharashtra Assembly Election 2024: Electoral Data & Reports.*
5. *Statistical Reports on Maharashtra Legislative Assembly Election, 2024.* New Delhi: Election Commission of India.
6. Palshikar, Suhas."Party Competition and Electoral Politics in Maharashtra." *Economic and Political Weekly,* Vol. XX, No. XX.
7. Indian Express, Maharashtra Election Analysis & Exit Poll Reports, 2024.